मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » मंगळवार, दि. 23 सप्टेंबर 2025 | पान- 1

# पिंपरी-चिंचवडमधील गुंडगिरी, दादागिरीचा बीमोड करा

## कोणाचीही गुंडगिरी, दादागिरी, दहशत अजिबात चालता कामा नये; उपमुख्यमंत्री अजित पवार



**पिंपरी | प्रतिनीधी**

'शहरातील कायदा आणि सुव्यवस्था चांगली राहायला हवी. महिलांना मानसन्मान मिळाला पाहिजे. त्यांची फसवणूक, अडवणूक होता कामा नये. कोणाचीही गुंडगिरी, दादागिरी, दहशत अजिबात चालता कामा नये, सर्वसामान्य नागरिकांवर सत्ताधारी, विरोधक किंवा गुंड प्रवृतीची व्यक्ती अन्याय करत असेल, तर त्यांचा बंदोबस्त करावा,' असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शनिवारी पोलिसांना दिले.

पिंपरी-चिंचवड शहरातील नागरिकांच्या समस्या जाणून घेण्यासाठी पवार यांनी शनिवारी चिंचवड येथे जनसंवाद सभा घेतली. त्याला नागरिकांची मोठी गर्दी झाली. या वेळी त्यांनी नागरिकांशी संवाद साधला. विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, महापालिका आयुक्त शेखर सिंह, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पीएमआरडीएचे आयुक्त योगेश म्हसे, महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांच्यासह विविध शासकीय कार्यालयांचे अधिकारी या वेळी उपस्थित होते.

काही जणांकडून त्रास दिला जात असल्याची तक्रार रहाटणी, पिंपळे सौदागर येथील गृहनिर्माण सोसायटीतील महिलांनी पवार यांच्याकडे केली. पोलिसांनी केवळ अदखलपात्र गुन्हा दाखल केल्याचे सांगितले. त्यावर पवार म्हणाले, 'शहरातील कायदा-सुव्यवस्था चांगली राहावी, यासाठी मी आग्रही असतो. लाडक्या बहिणींना, महिलांना मानसन्मान मिळाला पाहिजे. त्यांची फसवणूक, अडवणूक होता कामा नये, त्यांची सुरक्षा महत्त्वाची आहे. शहरात कोणाचीही गुंडगिरी, दादागिरी, दहशत अजिबात चालता कामा नये, सर्वसामान्य नागरिकांवर सत्ताधारी, विरोधक किंवा गुंड प्रवृतीची व्यक्ती अन्याय करत असेल, तर अशांचा बीमोड करण्यात यावा.'

### अजब सल्ल्याचे गाऱ्हाणे

रस्त्याचा चढ तीव्र केल्याने मोटार वरती जात नसल्याची तक्रार करणाऱ्या कासारवाडी येथील एका ज्येष्ठ नागरिकाला महापालिका प्रशासनाने मोटार विकण्याचा अजब सल्ला दिला. त्यामुळे हा ज्येष्ठ नागरिक तक्रार घेऊन जनसंवादमध्ये आला. त्यांनी पवार यांच्याकडे तक्रार केली. त्यावर तक्रार तत्काळ निकाली काढण्याचा आदेश पवार यांनी दिला.

" जनसंवादमध्ये अनेकांचे प्रश्न जागेवरच सोडविण्याचा प्रयत्न केला आहे. नागरिकांचे प्रश्न सोडविण्यासाठी कटिबद्ध आहे. यापुढील काळातही नागरिकांशी जनसंवाद सुरूच ठेवणार आहे.

– अजित पवार, उपमुख्यमंत्री.

### पाणीपुरवठ्याच्या सर्वाधिक तक्रारी

» 'स्वच्छ, मुबलक पाणी मिळत नाही, पाणीपुरवठा विस्कळीत असतो, चांगले रस्ते नाहीत, कचऱ्याची व्यवस्थित विल्हेवाट लागत नाही, अशा तक्रारी सर्वाधिक होत्या,' असे अजित पवार यांनी सांगितले. नगरविकास, कामगार, सामाजिक यांसह विविध विभागांशी संबंधित प्रश्न नागरिकांनी सांगितले. काही प्रश्न तत्काळ फोन लावून मार्गी लावण्याचा प्रयत्न केल्याचेही ते म्हणाले.

---

# नवरात्रोत्सवाला आजपासून उत्साहात प्रारंभ

## नवरात्र म्हणजे स्त्री शक्तीचा जागर, नऊ दिवस होणारी नऊ रंगांची उधळण

**पिंपरी | प्रतिनीधी**

नवरात्रोत्सवाला उद्यापासून (ता. २२) प्रारंभ होत आहे. नवरात्र म्हणजे स्त्री शक्तीचा जागर, नऊ दिवस होणारी नऊ रंगांची उधळण, श्रीसुक्ताचे पठण त्याच बरोबर तरुणाईसाठी आयोजित केले जाणारे गरबा व दांडियाचे कार्यक्रम.

आदिशक्तीचा जागर असणाऱ्या नवरात्रोत्सवामुळे शहरातील वातावरणही चैतन्यमय झाले आले. घरोघरी मवारी घटस्थापनेसाठी लगबग सुरू आहे. शहरातील देवीच्या मंदिरांनाही रोषणाई करण्यात आली आहे. पिंपरी चिंचवडमधील देवींच्या मंदिरामध्ये गेल्या आठवड्यापासूनच तयारी सुरू होती. यामध्ये मंदिरांची साफसफाई, रंगरंगोटी करण्याबरोबरच भक्तांच्या सोयीसाठी दर्शनबारी व मंडपही उभारण्यात आले आहेत. आकुर्डीतील तुळजाभवानी मंदिर, पिंपरीतील कालिकामाता मंदिर, खराळवाडीतील खराळाई मंदिर, दुर्गा टेकडीवरील दुर्गादेवी मंदिर, पिंपरीतील वैष्णोदेवी मंदिर, दापोडीतील फिरंगाई, पिंपळे गुरव येथील तुळजाभवानी मंदिरात सोमवारी घट बसवले जातील.



रविवारी तयारी पूर्णत्वास नेण्यात आली. शहरातील इतर मंदिरांनाही रोषणाई करण्यात आली आहे. अनेक ठिकाणी नऊ दिवस विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

तरुणाईची सज्जता

तरुणांसाठी नवरात्र म्हणजे दांडिया व गरबाचे कार्यक्रम. यावर्षी शहरातील बहुतांश प्रभागांमध्ये रासदांडिया कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामुळे दांडियासाठी आवश्यक घागरा, केडिया यांची खरेदी करण्यासाठी तरुणांनी पिंपरी मार्केटसह उपनगरांमधील दुकानांमध्ये गर्दी केली होती. त्यासोबतच चांदीचे दागिने, लहान मुलांची ड्रेपरी यांचीही खरेदी करताना महिला दिसून आल्या.

### बाजारामध्ये गर्दी

» रविवारी घटस्थापनेचे पूजासाहित्य घेण्यासाठी बाजारात मोठी गर्दी झाली होती. महिलावर्गाकडून घराची साफसफाई यापूर्वीच करण्यात आली होती. ही तयारी झाल्यावर घटस्थापनेचे साहित्य घेण्यासाठी बहुतांश नागरिक रविवारी सहकुटुंब बाहेर पडले. सर्वच बाजारपेठा, मंडईसह फुल बाजारात ग्राहकांची गर्दी झाली होती. घटस्थापनेसाठी आवश्यक माती, मातीचे घट, सात प्रकारची धान्ये, परडी, देवीचे वस्त्र, विड्याची पाने, सुपारी, फुले, हार यांसह पूजेचे साहित्य खरेदी करण्यात आले.

# फक्त डागडुजी नकोच, चागले रस्ते पाहिजेत

## प्रशासनाने लक्ष घालून चांगले रस्ते बनवावेत : विकास साने

**पिंपरी | प्रतिनिधी**

वरवरच्या डागडुजीमुळे चिखलीतील रस्त्यांची दुरावस्था झाली आहे. एक ही रस्ता चांगला राहीलेला नाही. चिखलीती रस्त्यांची फक्त डागडुजी नको तर व्यवस्थित रस्ते करा, त्यासाठी महापालिकेने फ प्रभागासाठी बजेट वाढवा म्हणजे रस्त्यांसह विकासकामे मार्गी लागतील अशी मागणी करण्यात येत आहे.

चिखली परिसरात टाऊनहॉल बाजूने तळवडेला कनेक्ट होणारा रस्ता, सोनवणे वस्ती रोड, पाटीलनगर, अंतर्गत रस्ते या सर्व रस्त्यांची सध्या पावसामुळे दुरावस्था झालेली आहे. पाऊस बंद झाल्यानंतर या रस्त्यावर वरवरचा मुलामा केला जातो. मात्र तात्पुरत्या स्वरूपात मुलामा नको तर रस्ते चांगले करा डांबरी रस्त्यामुळे नागरिकांना त्रास होणार नाही. वाहतूक कोंडी फुटण्यास मदत होईल असे वाहनचालकांचे म्हणने आहे.



> चिखली परिसरातील विकासकामांसाठी सर्वात कमी बजेट असल्यामुळेच रस्त्यांची वरवरची कामे सुरु आहेत. मात्र बजेट वाढवून नियोजित आणि मजबूत रस्ते करावेत, यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडेही मागणी केली आहे. परिसरातील नागरिकांना चांगल्या रस्त्याची गरज आहे. त्यानुसार प्रशासनाने लक्ष घालून चांगले रस्ते बनवावेत.
>
> **- विकास साने, सामाजिक कार्यकर्ते)**

> चिखली परिसरातील काही डीपी रस्त्यांचे भूसंपादन झालेले नाही. ही प्रक्रिया पूर्ण होताच महत्वाच्या रस्त्यांची कामे सुरु होतील. अंतर्गत रस्त्यांचे पाऊस बंद झाल्यानंतर खड्डे बुजवून दुरुस्ती केली जाईल.
>
> **- शिवाजी चौरे, स्थापत्य फ प्रभाग**

# चिंचवड स्टेशन परिसरातील मार्ग बंद; नागरिक त्रस्त

## मेट्रोच्या कामामुळे चिंचवड-निगडी परिसरात सेवा रस्त्यांची अवस्था दयनीय



**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरात मेट्रोचे चिंचवड ते निगडी विस्तारीकरणाचे काम सुरू असून सुरुवातीला निगडीपासून कामाला प्रारंभ झाला. मात्र, अद्याप तेथील काम पूर्ण झाले नाही आणि अत्यंत संथ गतीने सुरू आहे.

नव्या टप्प्यात चिंचवड स्टेशन येथील मार्ग वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे. त्यामुळे निगडी ते चिंचवड स्टेशनदरम्यानचा सर्व्हिस रस्ता अतिशय खराब झाला असून, दैनंदिन वाहतूक कोंडीमुळे नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

सध्या चिंचवड स्टेशन परिसरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते महावीर चौक हा मार्ग बंद करण्यात आला आहे. याऐवजी निगडीकडून येणाऱ्या वाहनांनी छत्रपती शिवाजी महाराज चौकातून डावीकडे वळून बीएसएनएल कार्यालयासमोरून उजवीकडे वळत महावीर चौकातून पुढे जाण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

मात्र, या रस्त्यावर आधीच वाहनांची संख्या मोठी असल्याने आता वाहतूक कोंडी अधिकच वाढण्याची शक्यता व्यक्त होत आहे. नागरिकांनी याबाबत नाराजी व्यक्त केली असून, मेट्रो कामाचा वेग वाढविण्याची मागणी होत आहे.

# ‘सेवा पंधरवडा’ निमित्त पंतप्रधान मोदींच्या जीवन चरित्रावरील माहितीपट व प्रदर्शनी व्हॅनचे उद्घाटन

## शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, आमदार शंकर जगताप, आमदार उमाताई खापरे यांच्या हस्ते अत्याधुनिक एलईडी व्हॅनचे उद्घाटन

**पिंपरी | प्रतिनिधी**

भारताचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त देशभरात सुरू असलेल्या ‘सेवा पंधरवडा’ अभियानांतर्गत पिंपरी-चिंचवड शहरात त्यांच्या जीवन प्रवासावर आधारित माहितीपट आणि विशेष प्रदर्शनीचे भव्य आयोजन करण्यात आले. सोमवार, २२ सप्टेंबर २०२५ रोजी पिंपरी येथील भाजप शहर मध्यवर्ती कार्यालयात या कार्यक्रमाचे औपचारिक उद्घाटन झाले.

या प्रसंगी भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, आमदार शंकर जगताप, आमदार उमाताई खापरे व माजी आमदार श्रीमती अश्विनी जगताप यांच्या हस्ते अत्याधुनिक एलईडी व्हॅनचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी सरचिटणीस मोरेश्वर शेडगे, मधुकर बच्चे, विकास डोळस, वैशाली खाडये, माजी प्रदेश सदस्य राजेश पिल्ले, संतोष कलाटे, माऊली थोरात, वरिष्ठ उपाध्यक्ष काळूराम बारणे, युवा मोर्चा अध्यक्ष दिनेश यादव, शहर प्रवक्ते कुणाल लांडगे, अभियान संयोजक तुषार हिंगे, विनायक गायकवाड, संजय पटणी, राम वाकडकर, मंडल अध्यक्ष गणेश ढोरे, हर्षल नढे, सोमनाथ तापकीर, जयदीप खापरे, अजित बुर्डे, रामदास कुटे, माजी नगरसेवक संदीप कस्पटे, सुरेश भोईर, संदीप वाघेरे, राजू दुर्गे, रवींद्र देशपांडे, विठ्ठल भोईर, बिभीषन चौधरी, कैलास सानप, अभिजीत बोरसे, युवराज लांडे, गोरक्षनाथ झोळ, दत्ता झुळूक, सतीश नागरगोजे, सचिन राऊत, नंदू कदम, आल्हाट ताई, नीता कुशारे, प्रीतिंसिंह परदेशी, सीमा चव्हाण यांच्यासह अनेक आजी-माजी लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



कार्यक्रमाच्या सुरुवातीला पंतप्रधान मोदींच्या जीवन चरित्रावर आधारित माहितीपट दाखवण्यात आला, ज्यामध्ये त्यांच्या बालपणातील संघर्षापासून ते गुजरातचे मुख्यमंत्री आणि नंतर भारताचे पंतप्रधान म्हणून त्यांनी घेतलेल्या धाडसी निर्णयांचा प्रवास उलगडण्यात आला. उपस्थितांनी या माहितीपटाचे कौतुक केले. यासोबतच, मोदींच्या दूरदृष्टीच्या नेतृत्वाखाली देशाने विविध क्षेत्रांत केलेली प्रगती दर्शवणारी आकर्षक ‘प्रदर्शनी’ देखील सर्वांसाठी खुली करण्यात आली.

यावेळी बोलताना आमदार शंकर जगताप म्हणाले, “पंतप्रधान मोदींच्या ‘सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास’ या धोरणाने देशाचा चेहरामोहरा बदलला आहे. त्यांचे जीवन हे प्रत्येक भारतीयासाठी प्रेरणादायी आहे. ही एलईडी व्हॅन आणि प्रदर्शनी पिंपरी-चिंचवडमधील प्रत्येक प्रभागात जाऊन जनतेला मोदींच्या कार्याची माहिती देईल.”

हे अभियान यशस्वी करण्यासाठी संयोजक तुषार हिंगे, विनायक गायकवाड आणि संजय पटणी यांनी विशेष मेहनत घेतली. ही एलईडी व्हॅन पुढील पंधरा दिवस शहराच्या विविध भागात फिरणार असून, जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत मोदींच्या जीवन आणि कार्याचा संदेश पोहोचवण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

# आयआयएम मुंबईचे केंद्र आता पुण्यात

## केंद्रीय नागरी उड्डाण व सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांचा प्रस्ताव मंजूर

**पुणे | प्रतिनिधी**

शिक्षणाचे माहेरघर असलेल्या पुण्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला जाणार असून नवे शैक्षणिक द्वार खुले होत आहे. देशातील नामांकित व्यवस्थापन शिक्षणसंस्था म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आयआयएम मुंबईचे केंद्र आता पुण्यात सुरु होत आहे. केंद्रीय नागरी उड्डाण व सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी मांडलेल्या प्रस्तावाला संस्थेच्या अधिष्ठाता समिती आणि त्यानंतर विद्या परिषदेने मान्यता दिल्यानंतर हा निर्णय अधिकृत झाला आहे.




आयआयएम मुंबईचे केंद्र पुण्यात व्हावे, यासाठी केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी प्रस्ताव दिला होता. त्यावर निर्णय होत पुणे केंद्र सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पुणे केंद्राची स्थापना ही केवळ पुण्याच्या नव्हे, तर महाराष्ट्राच्या शैक्षणिक आणि औद्योगिक परंपरेतील एक ऐतिहासिक टप्पा मानला जात आहे. पुणे हे देशातील अग्रगण्य तंत्रज्ञान व औद्योगिक केंद्र म्हणून जलद गतीने विकसित होत आहे. बहुराष्ट्रीय कंपन्यांचे जाळे, अत्याधुनिक संशोधन-विकास केंद्रे, वाढती स्टार्टअप संस्कृती आणि ऑक्सफर्ड ऑफ द इस्ट अशी मिळालेली शैक्षणिक ओळख या सर्व पार्श्वभूमीवर आयआयएम मुंबईचा कॅम्पस शहरासाठी केवळ नैसर्गिक पूरकच ठरणार नाही, तर जागतिक दर्जाच्या व्यवस्थापन शिक्षणाला इथल्या विद्यार्थ्यांना थेट दाराशी आणून देणार आहे.

या कॅम्पसच्या माध्यमातून उद्योजकतेला नवा उन्मेष मिळेल, व्यवस्थापन कौशल्यांचा वापर करून नाविन्यपूर्ण कल्पनांचे यशस्वी व्यवसायांत रूपांतर साधता येईल. हा उपक्रम स्वावलंबी भारताच्या संकल्पनेशी सुसंगत असून विकसित भारत २०४७ या राष्ट्रीय दृष्टिकोनाला बळकटी देणारा ठरेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

याबाबत माहिती देताना आयआयएम मुंबईचे संचालक प्रा. मनोज कुमार तिवारी म्हणाले, 'आमचा प्रयत्न राहील की शैक्षणिक वर्ष २०२६ पासून प्रस्तावित पुणे केंद्रात क्षमता विकास कार्यक्रम तसेच अल्पावधी कार्यकारी प्रशिक्षण कार्यक्रम सुरू करता यावेत. ही महत्त्वाची संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल आम्ही केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांचे मनःपूर्वक आभारी आहोत. यामुळे आयआयएम मुंबईला विकसित भारत २०४७ या ध्येयाच्या दिशेने मोलाचे योगदान देता येईल.'

> पुण्यात आयआयएम मुंबईचे केंद्र स्थापन होणे ही अभिमानाची बाब आहे. मुंबई ही आर्थिक राजधानी आणि पुणे हे तंत्रज्ञान व शिक्षणाचे केंद्र आहे. या दोन्ही शहरांमध्ये निर्माण होणारा 'नॉलेज कॉरिडॉर' ही देशाच्या औद्योगिक व शैक्षणिक क्षेत्रासाठी नवी पर्वणी ठरेल. या निर्णयामुळे महाराष्ट्राला जागतिक दर्जाच्या व्यवस्थापन शिक्षणाची नवी ऊर्जा मिळेल आणि नव्या पिढीसमोर संधींचे विस्तीर्ण क्षितिज खुले होईल. पुणे अनेक दशकांपासून देशाचे प्रमुख शैक्षणिक केंद्र राहिले आहे आणि आता ते तंत्रज्ञान, उत्पादन तसेच आयटीचे बळकट हब म्हणूनही उदयास आले आहे. याच वैशिष्ट्यांचा विचार करून आयआयएम मुंबई आपला नवा कॅम्पस पुण्यात स्थापन करीत आहे.
>
> **- मुरलीधर मोहोळ, केंद्रीय राज्यमंत्री.**

# हिंजवडी आयटी पार्क आणि चाकणची वाहतूक कोंडी फुटणार

## चाचपणी करून पर्यायी मार्गांची पाहणी करावी; उपमुख्यमंत्री अजित पवार यांची सूचना

**पुणे | प्रतिनिधी**

'महाराष्ट्र मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनकडून (महामेट्रो) हाती घेण्यात आलेल्या दुसऱ्या टप्प्यातील भक्ती-शक्ती मार्गावरील मेट्रो मार्गिका तळवडेपासून पुढे चाकणच्या महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळापर्यंत (एमआयडीसी) नेण्यात येणार आहे. मात्र, या मार्गावरील बहुतांश स्थानिक नागरिक हिंजवडी आणि चाकण एमआयडीसीमध्ये कामासाठी ये-जा करत असतात. त्या दृष्टीने या नागरिकांना जास्तीजास्त कसा फायदा होईल, त्यांना मेट्रोचा सहज लाभ कसा घेता येईल, वाहतुकीचा ताण कसा कमी होईल, या दृष्टीने चाचपणी करून पर्यायी मार्गांची पाहणी करावी,' अशा सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी 'महामेट्रो'ला दिल्या.



पिंपरी-चिंचवडमधील वाहतूक कोंडी आणि भविष्यातील मेट्रो विस्ताराच्या आराखड्यासंदर्भात उपमुख्यमंत्री पवार यांनी सकाळी सात वाजता 'महामेट्रो'च्या कार्यालयात बैठक घेतली. विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, पुणे महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर, महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह आणि इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. पदाधिकारी आणि संचालकांबरोबर त्यांनी बैठक घेतली.

'महामेट्रो'च्या प्रस्तावित मेट्रो मार्गानुसार भक्ती-शक्ती चौकापासून पुढे मुकाई चौक, भूमकर चौक, भुजबळ चौक, पिंपळे सौदागर, नाशिक फाटा, वल्लभनगर, टाटा मोटर्स कंपनी, तळवडे असा सुमारे ४१ किलोमीटर लांबीचा प्रकल्प आहे. मात्र, पिंपरी आणि इतर परिसरातून यामार्गाद्वारे पुढे 'एमआयडीसी'पर्यंत कामगार आणि नागरिक प्रवास करत असतात. मात्र, गेल्या सहा महिन्यांपासून हिंजवडी आणि चाकण परिसरातील वाहतूक कोंडीचा प्रश्न जटील बनला आहे. त्या पार्श्वभूमीवर प्रस्तावित आराखड्यात आणखी पर्यायी सेवा कशी देता येईल, त्यांना मेट्रोचा कसा लाभ होईल, विशेषतः चाकण 'एमआयडीसी'तील कर्मचाऱ्यांच्या दृष्टीने हा मेट्रो कसा फायद्याचा ठरेल, या दृष्टीने मेट्रो स्थानिक भागातून वळविणे शक्य आहे किंवा नाही, याची चाचपणी करून पर्याय तयार करावेत,' अशा सूचना पवार यांनी दिल्या आहेत.

### 'डबल डेकर पुलांबाबत सूचना'

**» रामवाडी ते वाघोली या प्रस्तावित मेट्रो मार्गिकेवरील दुहेरी उड्डाणपूल (डबलडेकर) आणि सासवड मार्गावरील उड्डाणपूल संदर्भात चर्चा केली. यावेळी वाघोली मार्गावरील उड्डाणपूल महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत (एमएसआरडीसी) करण्यात येत आहे, तर सासवड रस्त्यावरील डबल डेकर पूल हा भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (एनएचएआय) यांच्याबरोबर करण्यात येत आहे. या विषयांबाबत चर्चा करण्यात आली. या वेळी पवार यांनी अनेक सूचना केल्या.**

> या प्रस्तावित मेट्रो मार्गाला मंजुरी मिळण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत लवकरच विशेष बैठक आयोजित केली जाणार आहे. या बैठकीत अंतिम ठराव आणि विस्तारीकरणावर अंतिम निर्णय घेतला जाणार आहे. त्यानुसार पवार यांनी 'डीपीआर'मध्ये सुचविलेले काही बदल आणि तळवडेपासून पुढील मार्गाचा अंतर्भाव असा मिळून सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात येणार आहे.
>
> **- श्रावण हर्डीकर, व्यवस्थापकीय संचालक, 'महामेट्रो'.**

# पुरंदर तालुक्यात ग्राम सुरक्षा यंत्रणेला घरघर

## नीरा, मांडकी, जेऊर, पिंपरे, गुळुंचे, कर्नलवाडी, थोपटेवाडी, पिसुर्टी यांसारख्या गावांमध्ये वारंवार चोरीच्या घटना

**पुणे | प्रतिनिधी**

पुरंदर तालुक्यातील ग्राम सुरक्षा यंत्रणा पूर्णपणे ठप्प झाल्याचे चित्र आहे. गावागावांतून या यंत्रणेच्या निष्क्रियतेमुळे ग्रामस्थांमध्ये नाराजी पसरली आहे. चोरी, दरोडा, आग, सर्पदंश, बिबट्याचा हल्ला, अपघात यांसारख्या आपत्कालीन परिस्थितीत तत्काळ मदत मिळवण्यासाठी शासनाने सुरू केलेली ही यंत्रणा प्रभावी ठरत होती. मात्र, ग्रामपंचायतींच्या उदासीनतेमुळे आणि यंत्रणेच्या देखभालीकडे लक्ष न दिल्याने ही सुविधा बंद पडली आहे. यामुळे ग्रामस्थांना आपत्कालीन परिस्थितीत जलद मदत मिळणे कठीण झाले आहे.

ग्राम सुरक्षा यंत्रणेद्वारे १८००२७०३६०० या क्रमांकावर कॉल करून गावातील कोणतीही व्यक्ती आपत्कालीन परिस्थितीची माहिती देऊ शकत होती. यामुळे संबंधित पोलिस ठाण्याला तत्काळ माहिती मिळून घटनांवर नियंत्रण मिळविणे शक्य होत होते. चोरी, दरोडा, आग, अपघात यांसारख्या घटनांवर त्वरित कारवाई होत असे. मात्र, गेल्या तीन वर्षांपासून ग्रामपंचायतींचे सरपंच, उपसरपंच, कर्मचारी आणि ग्रामस्थ यांनी या यंत्रणेचा वापर करणे बंद केले आहे. परिणामी, ही यंत्रणा पूर्णपणे ठप्प झाली असून, ग्रामपंचायतींचे पैसेही वाया जात आहेत.



### तालुक्यातील वाढत्या गुन्ह्यांमुळे चिंता

गेल्या दोन-तीन महिन्यांत पुरंदर तालुक्यातील सासवड आणि जेजुरी पोलिस ठाण्याच्या हद्दीत चोरी, घरफोडी आणि विद्युत रोहित्र चोरीच्या अनेक घटना घडल्या आहेत. नीरा, मांडकी, जेऊर, पिंपरे, गुळुंचे, कर्नलवाडी, थोपटेवाडी, पिसुर्टी यांसारख्या गावांमध्ये वारंवार चोरीच्या घटना घडत आहेत. ऑगस्टच्या शेवटच्या आठवड्यात आणि सप्टेंबर महिन्यात जेऊर, मांडकी, पिंपरे (खुर्द), गुळुंचे, कर्नलवाडी येथे चार-पाच व्यक्ती कोयते आणि रुमाल बांधून घरफोडीच्या उद्देशाने फिरताना ग्रामपंचायतींच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमध्ये आढळले. मात्र, अशा वेळी ग्राम सुरक्षा यंत्रणेचा प्रभावी वापर न झाल्याने या घटना रोखण्यात अपयश आले आहे.

### ग्रामपंचायतींची उदासीनता

» मागील काही वर्षांपासून ग्रामपंचायतींनी या यंत्रणेची देखभाल आणि त्यासाठी लागणारी रक्कम न भरल्याने ही योजना बंद पडली आहे. ग्राम सुरक्षा यंत्रणेचा आर्थिक भार ग्रामपंचायतींवर असतो. मात्र, ग्रामपंचायती या यंत्रणेचा उपयोग ग्रामसभेची माहिती, पाणीपुरवठा, आरोग्य शिबिरे, रेशन वाटप, आणि शासकीय योजनांच्या जनजागृतीसाठीही करत नाहीत. हजारो रुपये खर्च करूनही ग्रामपंचायत प्रशासन याबाबत उदासीन का आहे, असा प्रश्न ग्रामस्थांना पडला आहे.

### ग्रामस्थांची मागणी

» ग्राम सुरक्षा यंत्रणा पुन्हा कार्यान्वित व्हावी, अशी मागणी तालुक्यातील गावांमधील ग्रामस्थ करीत आहेत. ही यंत्रणा सुरू असताना चोरी आणि इतर गुन्ह्यांचे प्रमाण कमी होते. तसेच आपत्कालीन परिस्थितीत तत्काळ मदत मिळत होती. सध्या जिल्हा पातळीवर ही योजना पुन्हा प्रभावीपणे राबविण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे दिसत आहे. ग्रामस्थांनी या यंत्रणेचा वापर वाढवून गावातील सुरक्षितता सुनिश्चित करण्याची गरज व्यक्त केली आहे.

# भेंडी आणि घेवड्याच्या दरात वाढ

## उपवासामुळे पालेभाज्यांना मागणी कमी राहणार असून, पालेभाज्यांचे दर स्थिर

**पुणे | प्रतिनिधी**

घाऊक बाजारात भेंडी आणि घेवड्याच्या दरात वाढ झाली. अन्य फळभाज्यांचे दर स्थिर असल्याची माहिती व्यापाऱ्यांनी दिली. गुलटेकडीतील घाऊक बाजारात रविवारी राज्य, तसेच परराज्यातून ९० ट्रक फळभाज्यांची आवक झाली. कर्नाटक, तामिळनाडू, आंध्र प्रदेशातून हिरवी मिरची १५ टेम्पो, इंदूर येथून ६ टेम्पो गाजर, कर्नाटकातून ५ टेम्पो कोबी, आंध्र प्रदेश आणि तामिळनाडू येथून ३ ते ४ टेम्पो शेवगा, तामिळनाडूतून १०० प्लास्टिक जाळी (क्रेट्स) तोतापुरी कैरी, कर्नाटकातून ४ टेम्पो घेवडा, गुजरात, कर्नाटकातून मिळून ५ ते ६ टेम्पो भुईमूग शेंग, मध्य प्रदेशातून १० ते १२ टेम्पो लसूण अशी आवक परराज्यातून झाल्याची माहिती श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्डातील ज्येष्ठ अडते विलास भुजबळ यांनी दिली.



पुणे विभागातून ४०० ते ५०० गोणी सातारी आले, भेंडी ५ ते ६ टेम्पो, गवार ४ ते ५ टेम्पो, टोमॅटो ८ ते १० हजार पेटी, हिरवी मिरची १० ते १२ टेम्पो, काकडी ७ ते ८ टेम्पो, फ्लॉवर ८ ते १० टेम्पो, गाजर ४ ते ५ टेम्पो, कोबी ५ ते ६ टेम्पो, ढोबळी मिरची ८ ते १० टेम्पो, भुईमूग शेंग १०० गोणी, मटार ५०० ते ६०० गोणी, तांबडा भोपळा १० ते १२ टेम्पो, कांदा ९० ते १०० ट्रक अशी आवक झाली, तसेच इंदूर, आग्रा, स्थानिक भागातून बटाटा ५० ते ५५ टेम्पो अशी आवक झाली.

### पालेभाज्यांचे दर स्थिर

नवरात्रोत्सवाचा प्रारंभ सोमवारपासून (२२ सप्टेंबर) होत आहे. नवारात्रोत्सवात अनेकजण उपवास करतात. उपवासामुळे पालेभाज्यांना मागणी कमी राहणार असून, पालेभाज्यांचे दर स्थिर असल्याची माहिती व्यापाऱ्यांनी दिली. गुलटेकडी मार्केटयार्डातील तरकारी विभागात रविवारी कोथिंबीर दीड लाख जुडी, तसेच मेथीच्या ३० हजार जुडींची आवक झाली होती. पालेभाज्यांचे दर (शेकडा जुडी) – कोथिंबीर – ८०० ते १५००, मेथी – १२०० ते २०००, शेपू – ८०० ते १०००, कांदापात – ८०० ते २०००, चाकवत – ४०० ते ७००, करडई- ३०० ते ७००, पुदीना – ५०० ते १०००, अंबाडी – ३०० ते ७००, मुळे – ८०० ते १५००, राजगिरा – ४०० ते ७००, चुका- ५०० ते ८००, चवळई – ३०० ते ७००, पालक – ८०० ते १५००

### नवरात्रोत्सवानिमित्त फळांना मागणी

» नवरात्रोत्सवानिमित्त फळांना मागमी वाढली आहे. मार्केट यार्डातील फळबाजारात फळांची आवक वाढली आहे. लिंबांच्या दरात गोणीमागे ५० ते ६० रुपये आणि सीताफळाच्या दरात दहा टक्क्यांनी वाढ झाली. अन्य फळांचे दर स्थिर असल्याची माहिती व्यापाऱ्यांनी दिली. रविवारी फळबाजारात मोसंबी ८० ते ९० टन, संत्री २० ते २२ टन, डाळिंब १०० ते १२० टन, पपई ७ ते ८ टेम्पो, लिंबे एक हजार गोणी, कलिंगड ३ ते ४ टेम्पो , खरबूज २ ते ३ टेम्पो, चिकू एक हजार खोकी, पेरू ८०० ते ९०० प्लास्टिक जाळी, अननस ४ ट्रक, बोरे २५ ते ३० पोती, सफरचंद ७ ते ८ हजार पेटी, सीताफळ १५ ते २० टन अशी आवक झाली.